
सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२२७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ७ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६






सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२२७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ७ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६




## अखेर भारत-मालदीवचा वाद मिटला

### हिंदी महासागर क्षेत्रात स्थिरता आणि समृद्धीसाठी एकत्र काम करणार - पीएम मोदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू सध्या भारत दौऱ्यावर आले आहेत. यादरम्यान, मुइज्जू यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली. हैदराबाद हाऊसमध्ये झालेल्या भेटीदरम्यान, पीएम मोदी आणि मुइज्जू यांनी मालदीवमधील हनीमाधू आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन केले. यावेळी मालदीवमध्ये रुपे कार्डद्वारे पेमेंटही सुरू करण्यात आले. मोदी आणि मुइज्जू यांनी पहिला व्यवहार केला.

बैठकीनंतर दोन्ही नेत्यांनी हैदराबाद हाऊसमध्ये संयुक्त निवेदन जारी केले. पीएम मोदी म्हणाले की, भारत आणि मालदीवमधील संबंध शतकानुशतके जुने आहेत. भारत मालदीवचा सर्वात जवळचा शेजारी आणि जवळचा मित्र



आहे. आमच्या नेबरहुड फर्स्ट पॉलिसी आणि सागर व्हिजनमध्ये मालदीवचे महत्त्वाचे स्थान आहे. आम्ही संरक्षण आणि सुरक्षा सहकार्याच्या विविध पैलूंवर तपशीलवार चर्चा केली. एकता हार्बर प्रकल्पावर वेगाने काम सुरू आहे. आम्ही हिंदी महासागर क्षेत्रात स्थिरता आणि समृद्धीसाठी एकत्र काम करू.

मालदीवमध्ये सुरू असलेल्या भारतीय प्रकल्पांचा संदर्भ देत पीएम मोदी म्हणाले, आज आम्ही परस्पर सहकार्याला धोरणात्मक दिशा देण्यासाठी सर्वसमावेशक आर्थिक आणि सागरी सुरक्षा भागीदारी दृष्टीकोन स्वीकारला आहे. विकास हा आमच्या संबंधांचा एक महत्त्वाचा पैलू आहे आणि आम्ही नेहमीच मालदीवच्या लोकांच्या हिताला प्राधान्य दिले आहे. मालदीवच्या आवश्यकतेनुसार आज ४०० मिलियन अमेरिकन डॉलर्सच्या चलन स्वॅप करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. भारत आणि मालदीव मुक्त व्यापार करारावरदेखील चर्चा सुरू आहेत. आम्ही मालदीवमधील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी तयार आहोत. आज भारताच्या सहकार्याने बांधलेल्या ७०० हून अधिक सामाजिक गृहनिर्माण युनिट्स सुपूर्द करण्यात आल्या आहेत.

## महायुतीमधील तिन्ही पक्षांच्या उमेदवारी यादीचा मुहूर्त ठरला

### दसऱ्याच्या मुहूर्तावर महायुतीची पहिली यादी जाहीर होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा आता आठवड्याभरात होण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीमध्ये जागा वाटपची चर्चा सुरु आहे. भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी हे तिन्ही पक्षांसह महायुतीमधील छोट्या पक्षांनाही स्थान देण्यात येणार आहे. महायुतीमधील पक्षांनी जिंकलेल्या जागा अपवाद वगळता त्यांच्याकडे ठेवण्यात येणार आहे. महायुतीमधील तिन्ही पक्षांची उमेदवार यादीसुद्धा एकत्रित जाहीर करण्यात येणार



आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर महायुतीची पहिली यादी जाहीर होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**पहिल्या यादीत अनेकांचा समावेश**

महायुतीच्या उमेदवारांची एकत्रित यादी असणार आहे. या यादीत तिन्ही पक्षाच्या जास्तीत जास्त उमेदवारांचा समावेश करण्यात येणार आहे. ज्या जागांवर वाद आहेत, त्या नंतर जाहीर करण्यात येणार आहे. परंतु लोकसभेसारखी परिस्थिती होऊ नये म्हणून महायुतीने विधानसभेत जोरदार तयारी केली आहे. अनेक जागांवर उमेदवारांची नावेसुद्धा निश्चित झाली आहेत. लोकसभेत उमेदवारी जाहीर होण्यास उशीर झाल्यामुळे काही जागांवर महायुतीच्या उमेदवारांचा पराभव झाला. ऐनवेळेस उमेदवारी जाहीर झाल्यामुळे प्रचारास वेळ मिळाला नाही. तोपर्यंत विरोधी उमेदवाराचे प्रचाराचे दोन, तीन टप्पे पूर्ण झाले होते.

**एकनाथ शिंदे अन् अमित शाह यांच्यात चर्चा**

दिल्लीत पुन्हा एकदा भाजप नेते अन् गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची केमिस्ट्री जुळून आली. दिल्लीत नक्षलीग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक होती. या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खुर्ची अमित शहा यांच्या खुर्चीजवळ होती.

## रामराजे निंबाळकरांच्या पक्षप्रवेशाची तारीख ठरली? शरद पवारांचं इंदापुरात मोठं विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ इंदापूर**

लोकसभा निवडणुकीपासूनच अजित पवारांचीराष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीत नाराज असलेल्या रामराजे नाईक निंबाळकर शरद पवारांच्याराष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येणार, हे निश्चित मानलं जात आहे. सोमवारी (७ ऑक्टोबर) इंदापुरात हर्षवर्धन पाटील यांचा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात बोलताना शरद पवारांनी रामराजे नाईक निंबाळकरांचं नाव न घेता फलटणमध्येही पक्षप्रवेशाचा कार्यक्रम आहे, असे सांगितले आणि तारीखही जाहीर केली.

शरद पवार म्हणाले, चित्र बदलतंय. आज हाच कार्यक्रम झाला. निघायच्या वेळेला आणखी कुठून तरी फोन आला. त्यांनी हट्ट केला. इंदापुरला चाललाय, १४ तारखेला आमच्याकडे आलेच पाहिजे. काय कार्यक्रम आहे? म्हणाले, इंदापुरला आहे, तोच आमच्याकडे. म्हटलं कुठे? ते म्हणाले फलटणला, असं शरद पवारांनी सांगितले त्यानंतर हसतच त्यांनी उपस्थितांना प्रश्न





केला की, समजलं का?

पुढे बोलताना पवार म्हणाले, आता याच्यानंतर फलटण. फलटण झाल्यानंतर जवळपास सगळ्या महिन्याचे दिवस बुक झाले आहेत. मोठ्या प्रमाणात लोकांच्या मनात निर्णय आहे की, एकत्र आलं पाहिजे. परिवर्तन झालं पाहिजं. महाराष्ट्रातील चित्र वेगळं आहे, संपूर्ण हिंदुस्थानला दाखवलं पाहिजे. ती दाखवण्याची संधी आज महाराष्ट्रत आलेली आहे, असे शरद पवारांनी उपस्थितांना सांगितलं.

लोकसभा निवडणुकीत रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या उमेदवारीला रामराजे नाईक निंबाळकर यांनी विरोध केला होता. ते पराभूत झाले आम्ही जबाबदार राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला होता. त्यानंतर रणजितसिंह नाईक निंबाळकर पराभूत झाले.

आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर रामराजे नाईक निंबाळकर सातत्याने शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाण्याबद्दल कार्यकर्त्यांशी बोलत आहेत. दोन दिवसांपूर्वी फलटणमध्ये झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात रामराजे नाईक निंबाळकर यांनी तुतारी घ्यायची का? असा सवाल समर्थकांना केला. त्यांनी होकार दिला. त्यानंतर त्यांच्या पक्षप्रवेशाच्या चर्चेला बळ मिळाले आहेत. आता शरद पवारांनीही फलटणमध्ये पक्षप्रवेशाचा कार्यक्रम आहे, असे सांगून त्याला हवा दिली आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून भाजपची खरडपट्टी, हिंदुत्ववादी मुद्यांना बगल दिल्याने नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ मुंबई**

एकीकडे भाजपने जय्यत तयारी केलेली असतानाच पितृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मात्र भारतीय जनता पक्षावर नाराज असल्याचे समजते. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संघाकडून भाजपच्या नेत्यांची खरडपट्टी काढण्यात आली आहे. दक्षिण मुंबईमधील पदाधिकारी, नेत्यांवर नाराजी व्यक्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. हिंदुत्ववादी मुद्यांना बगल



दिल्याने संघ नाराज असल्याचे कळते. गिरगावमधील बैठकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वरिष्ठ नेत्यांकडून समज देण्यात आल्याची माहिती देखील मिळत आहे.

**इतर धर्मीयांचे लांगूलचालन नको**

गिरगावमध्ये काल ( रविवार) भाजप पदाधिकारी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी यांची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये संघाच्या वरिष्ठ नेत्यांकडून दक्षिण मुंबईतील वरिष्ठ नेत्यांवर नाराजी व्यक्त करण्यात आली. हिंदुत्वाच्या मुद्यांना बगल दिली जात असल्याचं संघाच्या वरिष्ठ नेत्यांचं म्हणणं आहे. इतर धर्मीयांचे लांगूलचालन करू नका, हिंदुत्वाच्या मुद्यांना प्राधान्य द्या, असे सांगत संघाच्या नेत्यांनी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना समज दिली.

**संघ प्रचारात उतरणार ?**

दरम्यान राज्याच्या विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ थेट प्रचारात उतरणार असल्याची चर्चा सध्या सुरू आहे. संघाने थेट विधानसभा निवडणूक प्रचाराच्या मैदानात उतरण्याची भूमिका घेतल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. लोकसभा निवडणुकांचे निकाल हाती आल्यानंतर निवडणुकीत अपेक्षित यश न मिळाल्याने संघाने भाजपला धारेवर धरले होते. महाराष्ट्रातील तसेच राज्यात पुरेसं यश न मिळाल्याची कारणमीमांसादेखील करण्यात आली होती.

## धनगड जातीचे सहा प्रमाणपत्र रद्द; धनगर जातीला एसटीमधून आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नगर**

राज्यातील धनगर समाजाला अनूसूचित जमातीचे आरक्षण देण्याची मागणी अनेक वर्षांपासून आहे. त्यासाठी राज्याभरात आंदोलने केली जातात. अनेक राज्यात धनगर समाजाला (एसटी) अनुसूचित जमातीचे आरक्षण आहे. काही राज्यांमध्ये धनगर समाजाला धनगड म्हटले जाते. धनगड आणि धनगर समाज एकच आहे. त्यामुळे धनगर समाजाला एसटीमधून आरक्षणाची मागणी होत आहे. त्यात आता संभाजीनगरमधील काही जणांना धनगड समाजाच्या जातीचे दाखले देण्यात आले होते. हे जातीचे दाखले जात पडताळणी समितीने रद्द केले आहेत. त्यामुळे धनगर समाजातील अनुसूचित जमातीमधून आरक्षण मिळविण्याचा मार्ग मोकळा झाल्याचा दावा भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी केला आहे.



धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण मिळविण्यासाठी अनेक वर्षांपासून लढाई सुरू आहे. राज्यामध्ये धनगड अस्तित्वात नाहीत, असा हायकोर्टाने धनगर आरक्षणाबाबत एक निकाल दिला होता. राज्य सरकारने प्रतिज्ञापत्र दिले होते की राज्यामध्ये एकही धनगड नाही. पण दुर्दैवाने संभाजीनगरमधील फुलंब्री तालुक्यातील भाऊसाहेब नामदेव खिल्लारे व त्यांच्या कुटुंबातील सहा जणांनी धनगड जमातीचे प्रमाणपत्र काढले होते. त्यातील सागर कैलास खिल्लारे यांनी जात पडताळणी समितीकडे प्रमाणपत्र सादर केले होते. परंतु पोलीस दक्षता पथकाच्या चौकशीमध्ये जातीसंदर्भात विसंगत माहिती व पुरावे मिळाले होते. त्यामुळे खिल्लारे यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला होता. आता छत्रपती संभाजीनगर येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने सुभाष नामदेव खिल्लारे यांच्यासह सहा जणांचे धनगड जातीचे प्रमाणपत्र रद्द केले आहे.

यावर धनगर आरक्षणासाठी लढणारे गोपीचंद पडळकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जात पडताळणी समितीने एक्दा दिलेला दाखला रद्द करण्याचा अधिकार जात पडताळणी समितीला नव्हता, तो अधिकार जात पडताळणी समितीला देऊन जे बोगस धनगडांचे दाखले काढले होते ते सहा दाखले रद्द केले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे मनःपूर्वक आभार मानतो. यामुळे धनगर एसटी आरक्षणाचा मार्ग मोकळा असल्याचा दाव गोपीचंद पडळकर यांनी केला आहे.

## श्रीपाद केने हा शहराच्या अस्वच्छतेचा बळी : फोटोसेशन थांबवा आणि कारवाई करा

### शिवराय कुळकर्णी यांची मागणी : पालकमंत्र्यांकडे मांडली शहराची व्यथा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

बडनेरा शहरात डेंग्यूच्या प्रादुर्भावाने काल १३ वर्षीय किशोर वयीन मुलाचा मृत्यू झाला असून हा शहरातील अस्वच्छतेचा बळी असल्याने शहराच्या स्वच्छतेची वाट लावणाऱ्या ठेकदारांवर कारवाईचा बडगा उचलण्यात यावा अशी मागणी भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी आज जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्याकडे केली आहे.अमरावती शहरात महानगरपालिकेकडून साफसफाई होत नसल्याने साथीचे आजार पसरत आहेत. काल बडनेरा येथे १३ वर्षीय श्रीपाद सचिन केने या किशोर वयीन मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्याचाच चुलत भाऊ डेंग्यू ग्रस्त असून तो रुग्णालयात दाखल आहे. शहरात शेकडो बालके अत्यवस्थ आहेत. दवाखाने गर्दीने तुडुंब आहेत. मात्र, महापालिका प्रशासन ढिम्म आहे.

या मुलाच्या मृत्यूने शहरावर शोककळा तर आहेच पण लोकांच्या मनात संतापाची लाट आहे. मृत मुलाच्या शोकाकुल नातेवाईकांसोबत आमदारासह इच्छुक उमेदवारांचे फोटोसेशन थांबवून गलिच्छ शहरासाठी कारणीभूत स्वच्छता ठेकेदारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी शिवराय कुळकर्णी यांनी केली आहे.जेव्हापासून





साफसफाईचा नवा कंत्राट देण्यात आला तेव्हा पासून अमरावती शहर अधिकाधिक गलिच्छ करण्याचा जागतिक विक्रम सुरू झाला आहे. या कंत्राटदारांसमोर 'ब्र' काढण्याची सामान्य माणसाची हिंमत नाही. कारण या सर्व ठेकेदारांना मोठा राजाश्रय आहे. मोठ्या नेत्यांचे बगलबच्चे शहराला अधिकाधिक घाण करून मलिदा लाटताहेत. हे ठेकेदार कोण आहेत, यांनी प्रत्येक प्रभागात सफाईसाठी किती माणसं नेमले आहेत, प्रत्येक प्रभागाला किती घंटीकटले किंवा घंटा गाड्या आहेत, प्रत्येक प्रभागात किती कचरा कंटेनर आहेत, फवारणी, गवत झुडपे कापणे, कचरा कंटेनर वेळेवर उचलणे ही कामे कोणाची, हा सर्व गोषवारा मनपाने जनतेसाठी जाहीर करायला हवा. ठेकेदार मोठ्या नेत्यांच्या गळ्यातला ताईत असल्याने तो सामान्य लोकांशी अरेरावी करतो. त्याला वठणीवर आणणाऱ्या अधिकाऱ्यांना राजकीय दबावात तोंडात मूग गिळून कारवाई न करता शहराची दुर्दशा सहन करावी लागते का, असे असंख्य प्रश्न जनतेच्या मनात आहेत. लोक संतप्त आहेत सोबत भयभीत पण आहेत.श्रीपाद सचिन केने या मुलाच्या मृत्यूसाठी पूर्णपणे शहराची अस्वच्छता कारणीभूत आहे. शहराची वाट लावणाऱ्या या ठेकेदारांवर कारवाई झाल्याशिवाय शहर स्वच्छ होणार नाही, असा जनतेचा सूर आहे.अमरावती मनपा अधिकाऱ्यांनी तात्काळ युध्दस्तरावर स्वच्छता अभियान राबवण्याचे निर्देश मनपा प्रशासनाला देण्यात यावे अशी मागणी देखील शिवराय कुळकर्णी यांनी केली आहे.

## संपादकीय ......

# ।।सोनियाचा दिनु।।

अखेर तो दिवस उजाडला. गेल्या कित्येक वर्षांपासूनची आपली मागणी पूर्ण होऊन माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला. गेली किती तरी वर्षे साहित्यिक, वाचक, प्रकाशक आणि सामान्य नागरिकांनीही ही मागणी लावून धरली होती. अत्यंत गोडवा असलेली आपली मराठी भाषा आता देशातील ११ अभिजात भाषांपैकी एक झालेली आहे. नवरात्रीच्या मंगलमय पर्वात पहिल्याच माळेला हा बहुमान मराठी भाषेला मिळणे ही खूपच आनंदाची बाब आहे. इथे 'पहिली माळ' हा शब्दप्रयोग मराठी घरातील तरुणांना समजणार नाही हे नक्की. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घरोघरी घट बसवले जातात. आली का पंचाईत! घट म्हणजे काय हे सांगावे लागेल की काय, अशी शंका येते. घट म्हणजे मातीच्या छोट्या भांड्याखाली माती टाकून त्यात धान्य पेरले जाते आणि हा घट देवीसमोर ठेवला जातो. या घटाला दररोज एक फुलांची माळ घातली जाते. पहिला दिवस प्रतिपदा म्हणजे पहिली माळ असते. असो.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे लगेच काही इंग्रजी शाळांमध्ये शिकणार्या आपल्या पाल्यांना तिथून काढून लोक मराठी माध्यमातील शाळेत घालणार नाहीत, हे निश्चित. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे इंग्रजी शाळांमधून दाखले म्हणजेच टीसी काढून लगेच मराठी शाळांमध्ये गर्दी होईल, अशी शक्यता नाही; परंतु अभिजात दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेच्या समृद्ध होण्याला गती मिळू शकते. आमच्या ज्या वाचकांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणजे नेमके काय झाले, हे माहीत नाही, त्यांच्यासाठी काही स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.

अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी महत्त्वाचे असे चार निकष आहेत. पहिला म्हणजे संबंधित भाषेच्या साहित्याचा इतिहास किमान दीड ते दोन हजार वर्षे इतका प्राचीन असावा. मराठी भाषेला तेवढा प्राचीन इतिहास आहे, हे निश्चित. तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वर आणि त्याहीपूर्वी चक्रधर स्वामी यांचे साहित्य मराठी भाषकांना पाठ होते. दुसरा निकष म्हणजे या भाषेतील प्राचीन साहित्य हे महत्त्वाचे आणि मौल्यवान असावे. साहित्य हे मौल्यवान असतेच; परंतु सर्व समाजाला समजेल असे ते असणे अपेक्षित आहे. मराठी भाषेला संत साहित्याची फार मोठी परंपरा आहे. आजही ग्रामीण भागात शेकडो अभंग पाठ असणारे अनेक भाविक आहेत. तिसरा निकष म्हणजे ही भाषा स्वयंभू असावी. ती इतर कोणत्या भाषेतून उसनी घेतलेली नसली पाहिजे. मराठी भाषा, मग ती ग्रामीण भागात रांगडेपणाने बोलली जात असणारी असो की शहरी भागात बोलली जाणारी सफाईदार असो, ती एक मूळ भाषा आहे हेसुद्धा या निमित्ताने सिद्ध झाले आहे.या दर्जाचा क्रमांक चारचा निकष म्हणजे प्राचीन भाषेचे स्वरूप हे सध्याच्या भाषेपासून वेगळे असावे. तेराव्या किंवा सतराव्या शतकात किंवा अगदी दोन हजार वर्षांपूर्वी पण बोलली, लिहिली जात असलेली मराठी आजच्या मराठीपेक्षा पूर्णतः वेगळी होती. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' त्या काळी वापरात असलेल्या प्राकृत भाषेत लिहिली आहे. त्यामुळेच आज 'ज्ञानेश्वरी'तील ओव्यांचा अर्थ लावण्यासाठी संदर्भ शोधावे लागतात.

# देवीच्या आरतीतलं प्रत्येक कडवं जणू काही देवीशी प्रत्यक्ष संवादच; वाचा भावार्थ!

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक**

*'दुर्गे दुर्गट भारी तुजवीण संसारी' ही आरती आपण आजवर कितीतरी वेळा म्हटली असेन. संगीतकार अजय-अतुल यांनी आरतीचे गाणे केले आणि त्याची मोहिनी अधिकच वाढली. उद्यापासून शारदीय नवरात्र सुरू होईल. घरोघरी देवीचे पूजन, स्तवन, कीर्तन होईल,त्यावेळेसही ही आरती म्हटली जाईल. देवीच्या अद्वितीय पराक्रमाचा आरतीरूपाने जयघोष होईल. ही पूजा केवळ आदिमायेची नाही, तर अखिल विश्वाला नवजीवन देणाऱ्या स्त्रित्वाची आहे. तिलाच समर्पित ही आरती...*




***दुर्गे दुर्घट भारी, तुजविण संसारी,***
***अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी,***
***वारी वारी जन्ममरणाते वारी,***
***हारी पडलो आता संकट निवारी।।***

*महिषासुर, शुंभ-निशुंभ, मधु-कैटभ अशा असंख्य दैत्यांचे पारिपत्य करणारी देवी जगदंबा, तुझा जयजयकार असो. तू दानवांचा नाश करून देवाला, मानवाला, अखिल विश्वाला तारून नेलेस, तशीच करूणा आमच्यावरही कर. जन्म-मरणाच्या फेऱ्यातून आम्हाला सोडव. आमच्या आयुष्याचे ध्येय गाठण्याची आम्हाला शक्ती दे आणि आमच्या मार्गात येणाऱ्या संकटांचे निवारण कर.*

***त्रिभुवन भुवनी पाहता, तूज ऐसी नाही,***
***चारी श्रमले परंतु, न बोलवे काही,***
***साही विवाद करिता पडिले प्रवाही,***
***ते तू भक्तालागी पावसी लवलाही।।***

*हे त्रिपुरसुंदरी, तुझ्या अलौकीक तेजावर भाळून खुद्द असूराला तुझ्याशी विवाह करण्याचा मोह आवरता आला नाही. मात्र, तू केवळ स्तुतीवर भाळणारी नाहीस, तू शौर्याला, पराक्रमाला मानणारी आहेस. तू दैत्यांना युद्धात पराजित करण्याचे आव्हान दिलेस. त्यांनी तुझ्या स्त्रीत्वाला कमी लेखण्याची चूक केली आणि आपलाच सर्वनाश ओढावून घेतलास. तुझ्या कर्तबगारीची वर्णने आम्ही सप्तशतीत वाचली आहेत. ती वर्णन वाचताना आमची परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी वाणी थकली. आमच्या ठायी असलेले षडरिपूदेखील तुझ्यासमोर नतमस्तक झालेत, आता फक्त तू आम्हाला आपलेसे करून घे आणि तुझा वरदहस्त आमच्या शीरावर ठेव.*

***प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा,***
***क्लेशापासून सोडी, तोडी भवपाशा,***
***अंबे तुजवाचून कोण पुरविल आशा,***
***नरहर तल्लीन जाहला पदपंकजलेशा।।***

*कोणतही मोठे संकट असो, परंतु त्यातून निघण्याचा मार्ग आईकडे असतोच. तू तर, समस्त विश्वाची जननी आहेस. तुझ्या नुसत्या सुदर्शनाने भक्तांना केवढातरी दिलासा मिळतो. तु सोबत आहेस, ही खात्री असली, की संकट, दु:खं, क्लेश यांना आयुष्यात थारा राहतच नाही. मन शांत झाले की भवपाशातून सोडवणूक करणेही सोपे जाते. आणि तरीसुद्धा आम्ही जर या मायाजाळात अडकून राहिलो, तर त्यातून सोडवायला तू जवळ आहेसच. ऋअंबे तुजवाचून कोण पुरविल आशा?' अतिशय तळमळीने, व्याकुळतेने, कृपाभिलाषी होऊन आम्ही तुझ्याकडे पाहत आहोत.*

*ज्याप्रमाणे, लहान मुलाला क्षणभरही आपली आई नजरेआड झालेली चालत नाही, तशीच भक्तांनाही तू नजरेआड गेलेली चालत नाही. एवढी तल्लीनता तुझ्या ठायी आलेली आहे.*

*तुझी प्रत्यक्ष भेट कधी होईल माहित नाही, तोवर मी माझ्या सभोवताली असलेल्या स्त्रिरूपातील तुझ्या अंशाचा नितांत आदर करेन. दुसऱ्यांना आदर करायला शिकवेन. माझी आई, बहीण ,बायको, मैत्रीण आनंदी असेल, सुरक्षित असेल, तर माझ्या हातून तुझीच पूजा झाली असे समजेन आणि केवळ नवरात्रीतच नव्हे, तर आमरण तुझ्या कार्याचा जागर करत राहीन.*

# शेतकऱ्यांनो गुणवत्तापूर्ण सोयाबीनसाठी काढणी व मळणी करताना कशी घ्याल काळजी?

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक –** लवकर पक्व होणाऱ्या वाणांचे सोयाबीनपीक आता पक्वतेकडे हळू-हळू जात आहे, तर मध्यम किंवा उशिरा पक्व होणार्या वाणांचे पिक दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. शेतकऱ्यांनी काढणी व मळणी करताना काय काळजी घ्यावी ते पाहूया.

सोयाबीनच्या लवकर पक्व होणाऱ्या जातींमध्ये ९०% शेंगा पिवळ्या झाल्यावर पीक काढता येते. याचा बियाण्याच्या उगवणीवर कोणताही विपरीत परिणाम होत नाही.

सोयाबीन दाणे भरण्याच्या किंवा परिपक्व होण्याच्या अवस्थेत असताना सतत पाऊस पडत असेल तर सोयाबीनच्या दाण्यांची (बियांची) गुणवत्ता कमी होऊ शकते किंवा सोयाबीनला कोंब फुटण्याची शक्यता असते.

म्हणून, योग्य वेळी पिकाची कापणी करणे आवश्यक असते. त्याच प्रमाणे जास्त उशिरा काढणी केल्यास शेंगा फुटल्यामुळे होणारे नुकसान किंवा बियाण्याची गुणवत्ता कमी होणे टाळता येते.

पिकाची कापणी करताना शेतात तण असल्यास त्याची पिकाबरोबर कापणी होणार नाही याची खबरदारी घ्यावी. कापणी करण्याअगोदर शेतातील रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत.

पीक तयार होण्याच्या दहा दिवस अगोदर हेक्टरी चार किलो डायथेन-एम ४५ या बुरशीनाशकाची ८०० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यामुळे बियाण्यावरील बुरशीजन्य रोगांचे नियंत्रण होऊन गुणवत्ता व उगवणशक्ती चांगली राखली जाते.



लवकर काढणीस तयार झालेल्या पिकाची कापणी धारदार विळ्याच्या सहाय्याने जमिनीलगत करावी, जेणेकरून शेतात शेंगा राहणार नाहीत.

कापणी करताना झाडे उपटून येणार नाहीत, याची काळजी घ्यावी अन्यथा बियाण्यात मातीचे खडे मिसळू शकतात. कापणी केलेल्या पिकाचे लगेच ढिग लावू नयेत व कापलेले पीक शेतातच उन्हामध्ये वाळू द्यावे.

कापलेल्या पिकाचे ढिग लावल्यास बियाण्याच्या प्रतीवर व उगवणशक्तीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते.

काढणी केलेले सोयाबीन पीक उन्हात वाळवल्यानंतर मळणी करणे. ताबडतोब मळणी करणे शक्य नसल्यास, पावसापासून संरक्षण करण्यासाठी पिक सुरक्षित ठिकाणी गोळा करावे.

मळणी यंत्राद्वारे मळणी करवायची असल्यास बियाण्यातील आर्द्रता १४ टक्क्यांपेक्षा कमी नसावी, तसेच मळणी यंत्राचे फेरे (आरपीएम) मिनिटाला ३५० ते ४०० पर्यंत मर्यादित ठेवावेत.

मळणी यंत्र चालू असताना अधूनमधून पोत्यामध्ये पडणार्या बियाण्याकडे लक्ष ठेऊन बियांची डाळ होण्याचे प्रमाण जास्त होत असल्याचे निदर्शनास आल्यास आरपीएम कमी करावेत.

वरील सर्व पद्धतींद्वारे मळणी करत असताना जर एका पेक्षा जास्त सोयाबीनचे वाण असतील तर अशा वेळी त्यांची स्वतंत्रपणे मळणी करणे हे बियाण्याची शुद्धता राखण्याच्या दृष्टीने फायदेशीर ठरते.

मळणी झाल्यानंतर सोयाबीनचे बियाणे सिमेंटच्या खळ्यावर किंवा ताडपत्रीवर एकसारखे पसरवून बियाण्यातील आर्द्रता १०-१२ टक्के होईपर्यंत उन्हात वाळवावे. वाळलेल्या बियाण्यातील शेंगा, फोलपटे, काडी-कचरा, माती, खडे इ. वेचून काढून ते स्वच्छ करावे.

**– आघारकर संशोधन संस्था, पुणे**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

# मेळघाटात आनंदाचा शिधा, साड्यांचे वाटप रखडले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७धारणी–** महायुती शासनाबाहेर यावर्षी देण्यात आलेल्या आनंदाचा शिधा विविध कारणांमुळे मेळघाटात पोहचू शकला नाही. तर स्वस्त धान्य दुकानामार्फत कॅम्टीव्ह मार्केट योजनेतील एक रेशन कार्ड, एक साडी योजना आचारसंहितेमुळे अर्ध्यातच बंद झाल्याने मेळघाटात असंतोष पसरलेला आहे.




मेळघाटातील चिखलदरा व धारणी शहरासह संपूर्ण तालुक्यात गणपती उत्सवा दरम्यान प्रस्तावित आनंदाचा शिधा अप्राप्त राहिला. नंतर पितृपक्ष व आता नवरात्री उत्सव पण समाप्तीच्या मार्गावर आले तरी आनंदाचा शिधा वाटप झालेले नसल्याने मेळघाटात गरीब आदिवासींच्या मनात असंतोषपसरलेला आहे. महायुती सरकार आल्यापासून आनंदाचा शिधा अनेक वेळा वितरित करून गरिबांचे सण गोड करण्यात आलेले होते. यावर्षी गणपती उत्सवा दरम्यान शिधा वाटपाच्या घोषणा झाल्या मात्र आनंदाचा शिधा अप्राप्त राहिला तर नंतर पितृपक्ष संपले व आता नवदुर्गोत्सव पण समाप्तीकडे असून दसरा, दिवाळी उभे ठाकलेले आहेत. दरमयान आचार संहितापण लागल्याचे संकेत असून आनंदाचा शिधा मिळण्याची शक्यता समाप्त झाल्यासारखी आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी कॅटीव्ह मार्केटींग योजनेअंतर्गत अंत्योदयवाल्यांना एक रेशन कार्ड, एक साडी सुरू करण्यात आली होती.




# उतारवयात कोणते पदार्थ खाणे टाळावे?


**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

उतारवयामध्ये आजारपण कमी करणे, शारीरिक, मानसिक, सामाजिक कार्य सुस्थितीत चालू ठेवणे, समाजाचा उपयुक्त हिस्सा म्हणून जगणे ही तीन महत्त्वाची उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आहाराविषयी विचार करताना ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यपूर्ण दीर्घायुषी जीवनासाठीच्या आहारामध्ये आणि तरुणांच्या आहारात मूलभूत फरक नाही. परंतु, जसजसे वय वाढते, त्यानुसार आहारातून मिळणार्या उष्मांकाची गरज कमी होत जाते. उष्मांकाची दैनंदिन गरज वय वर्षे ४० ते ५० यामध्ये ५ टक्क्यांनी कमी होते. ५० ते ६० या वर्षाच्या काळात दैनंदिन गरज ७ टक्क्यांनी कमी होते आणि ६० वर्षांच्यापुढे १० टक्क्यांनी कमी हाते. म्हणजेच वयानुसार उष्मांकाची गरज भागविणारा; परंतु समतोल आहार आवश्यक असतो. समतोल आहाराची गरज भागवताना ज्येष्ठांच्या काही शारीरिक अवस्थांचा, समस्येचा विचार करावा लागतो.

ज्येष्ठांमध्ये वयानुसार काही शारीरिक बदल होत असतात, त्यामुळे भुकेचे प्रमाण कमी होते. शरीरात चालणार्या चयापचयाचा वेग कमी होतो. लवकर पोट भरते आणि गंध आणि चव यांचे प्रमाण कमी होते. नंतरच्या काळामध्ये जास्त गोड आणि जास्त खारट खाण्याकडे कल होतो. दाताचे आरोग्य अतिशय महत्त्वाचे आहे. दात खिळखिळे झालेले असल्यास पदार्थ चावण्याची क्रिया पूर्ण होत नाही. त्यासाठी दातांच्या डॉक्टरांना दाखवणे आणि जरूर पडल्यास कवळी बसवणे महत्त्वाचे.

उतारवयात पदार्थ गिळण्यास त्रास होऊ शकतो. त्यासाठी पदार्थ मऊ बनविणे आणि योग्य प्रमाणात पाणी घेणे जरुरीचे असते. वार्धक्यात पचननसंस्थेची कार्यक्षमता कमी होते. अशा वेळी जड खाणे किंवा जास्त स्निग्धांश असलेला आहार, जास्त प्रमाणातील जेवण, कमी चोथा असलेले पदार्थ, मद्यपान अशा पद्धतीच्या आहारामुळे अपचन होऊन वाताचे प्रमाण वाढते. जास्त गोड आणि मसालेदार खाण्याने पित्ताचे प्रमाण वाढते. कमी प्रमाणात पातळ पदार्थ आणि पाणी तसेच चघळचोथ्याच्या आहारामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास होऊ लागतो. त्यामुळे भुकेचे प्रमाण कमी होते



आणि त्याचा परिणाम म्हणून कुपोषण होते.

स्वास्थ्याच्या दृष्टीने मानसिक अवस्था अतिशय महत्त्वाची असते. अनेक ज्येष्ठ नागरिकांना एकटेपणा, उदासीनता याचा सामना करावा लागतो. शारीरिक ताकद कमी असल्यास हालचालींवर बंधन येतात. दृष्टी कमी होते. या सगळ्याचा परिणाम आहारावर होऊन शारीरिक गरजेपेक्षा कमी आहार घेतला जातो. ज्येष्ठ नागरिकांना अनेक वेळा काही आजारांची सोबत असते. मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार यांसारख्या आजारांचा सामना करताना काही वेळा त्यांचा बराचसा वेळ दवाखान्यात जातो किंवा कुटुंबातील इतरांच्या वेळापत्रकाशी जमवून घेताना आहाराच्या वेळा आणि प्रमाण पाहणे अवघड जाते. या सर्वांचा परिणाम भुकेचे प्रमाण कमी होणे, पचनसंस्थेचा त्रास जास्त होतो. अर्थातच यासर्व गोष्टींचा विचार करून प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांनी योग्य आहार घेणे आवश्यक आहे.

यासाठी आहारातील जास्तीत जास्त भाग हा वनस्पतीजन्य पदार्थापासूनच असावा. त्यामध्ये अॅन्टी ऑक्सिडंटस्, जीवनसत्त्वे, खनिजे, चघळचोथ्याचे प्रमाण जास्त असते. कोलेस्टेरॉलचे प्रमाण शून्य असते.

# महाराष्ट्रातील जुनी पेन्शनसाठीचे आमरण व जलत्याग उपोषण स्थगित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ वर्धा.** वर्धा येथे महाराष्ट्र राज्यात १ नोव्हेंबर २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन सरसकट लागू करावी यासाठी येथे ०२ ऑक्टोबर २०२४ पासून सुरू असलेले आमरण व जलत्याग उपोषण आंदोलन ६ ऑक्टोबर २०२४ रोजी डॉ. प्रशांत विघे यांना डॉ. प्रवीण रघुवंशी, सचिव महाराष्ट्र प्राध्यापक संघटना तथा अध्यक्ष, नुटा संघटना यांच्या हस्ते नाराळ पाणी देऊन सोडण्यात आले यावेळी आ.सुधाकर अडबले यांच्या उपस्थितीत होते.

प्रा.डॉ. प्रशांत विघे अमरावती येथील भारतीय महाविद्यालयातील तथा सिनेट सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती हे महाराष्ट्र राज्यातील शिक्षकाचे प्रतिनिधित्व करत आहे,यांच्यासोबत महाराष्ट्रातून विवीध विभागांतील १६ पेन्शन फायटर त्यात वितेश खांडेकर,जी. प.शाळा,गोंदिया, गोविंद उगले, जी. प.शाळा छ.संभाजी नगर, नदीम पटेल जी. प.शाळा,यवतमाळ,संजय सोनार ,आरोग्य विभाग, जळगाव,विक्रम रजपूत ,मृद व जलसंधारण विभाग, मोहन सोनटक्के, आदिवासी विकास विभाग, पालघर, प्रवीण बहादे,आरोग्य विभाग ,यवतमाळ, राजीव गावंडे ,महसूल विभाग,अमरावती, भारत पारखे ,आरोग्य खोडे ,वर्धा,अरविंद विभाग,यवतमाळ ,प्रमोद सुरोशे ,खढख , अचलपूर,अमरावती श्यामप्रसाद बांगर,आरोग्य विभाग,गोंदिया मोगलाजी जोर्गेवार ,आरोग्य विभाग,नांदेड ,अभिजित पाटील,जी. प.शाळा यवतमाळ ,शैलेश राऊत जी. प.शाळा, यवतमाळ,श्रीकांत भोवते या सर्वाना नारळ पाणी देऊन उपोषणाला स्थगिती देण्यात आली. दि. २ ते ४ ऑक्टोंबर २०२४ आमरण उपोषणसुरु होते तर ५ – ६ ऑक्टोंबर २०२४ जलत्याग आंदोलनं सुरु केले. या आंदोलनाच्या दरम्यान सात पेन्शन फायटरची प्रकृती गंभीर झाल्यामुळे ग्रामीण रुग्णालयामध्ये भरती करण्यात आले होते.




RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ७ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण


# तिसऱ्या आघाडीत आपण मेळघाट मधून कोणत्याही परिस्थितीत निवडून येऊच शकत नाही - पटेल

## १० ला सीएम शिंदेंच्या उपस्थित आ.राजकुमार पटेलांचा शिवसेनेत प्रवेश !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ मेळघाट –** परिवर्तन महाशक्ती आघाडीची मोट बांधत विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या प्रहार जनशक्तीचे नेते बच्चू कडूंना निवडणुकीआधीच मोठा धक्का बसला आहे आ. बच्चू कडू यांनी स्थापन केल्लेल्या तिसऱ्या आघाडीत आपण मेळघाट मधून कोणत्याही परिस्थितीत निवडून येऊच शकत नाही. याची कल्पना आपल्याला आली असल्याने आपण बच्चू कडू यांची साथ सोडण्याचा निर्णय घेतला असल्याचे स्पस्ट मत मेळघाटचे आमदार राजकुमार यांनी व्यक्त केले. येत्या १० ऑक्टबरला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मेळघाट दौऱ्यावर येणार असून




त्यांच्या उपस्थितीत आपण शिवसेनेत पक्ष प्रवेश करणार आहोत अशी माहिती आमदार राजकुमार पटेल यांनी दिली.

मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल यांनी रविवारी कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित केला होता या वेळी त्यानी आपल्या कार्यकर्त्यांसोबत चर्चा केलि व् नंतर निर्णय जाहिर केल . या मेळाव्याची कार्यक्रम पत्रिका शनिवारी शोशल मीडियावर समोर आली होती या पुत्रिकेवरून बच्चू कडू यांचा फोटो गायब होता तर एकनाथ शिंदे यांचा फोटो मोठ्या आकारात छापण्यात आला होता या पत्रिकेमुळे आमदार राजकुमार पटेल शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या चर्चेला तोंड फुटले होते आज राजकुमार पटेल यांनी स्वतः या बद्दल माहिती दिली. तिसऱ्या आघाडीत आपण मेळघाट मधून कोणत्याही परिस्थितीत निवडून येऊच शकत नाही यांची कल्पना मला आली व याची माहिती मी बच्चू कडू यांना दिली त्यामुळे त्यांनी स्वताहा मला निर्णय घेण्याचे सांगितले व आज मी शिंदे यांच्या शिवसेनेत सहभागी होणार असल्याचा निर्णय घेतला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मेळघाट मध्ये भरभरून निधी दिला व मला उमेदवारी देण्याचे हि कबूल केले असल्याचे हि पटेल म्हणालेत.

तिसऱ्या आघाडीचं मेळघाटमध्ये काही ताळमेळ नाहीये, म्हणून कार्यकर्त्यांना विश्वासात घेत मी प्रहारमधून बाहेर पडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जात असल्याची प्रतिक्रिया स्वत: राजकुमार पटेल यांनी दिली आहे.त्यामुळे आता शिवसेनेचा धनुष्यबाण पटेल यांना पेलणार का? पटेल यांच्या प्रचारार्थ महायुतीचे कोणते नेते पदाधिकारी प्रचारात उतरणार का? या सर्वांच्या नजरा लागलेल्या आहेत.

# आदिवासींच्या १२ हजार ५०० पदांवर 'बुलडोझर' फिरवला का ?

## ट्रायबल वुमेन्स फोरमचा सवाल; पाच वर्षापासून भरतीच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती :** सर्वोच्च न्यायालयाने गत सात वर्षापूर्वी ६ जुलै,२०१७ रोजी ऐतिहासिक न्याय निर्णय देऊनही सरकारने आदिवासी समाजा च्या १२ हजार ५०० पदांची पदभरती केली नाही. आदिवासी समाजाच्या घटनात्मक हक्काच्या राखीव पदांवर 'बुलडोझर' फिरवला का ? असा सवाल ट्रायबल वुमेन्स फोरम या महिला संघटनेने केला आहे.

राज्यात शासकीय व निमशासकीय सेवेतील आदिवासी समाजाची राखीव पदे गैरआदिवासींनी बळकावलेली आहे. ही पदे ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत रिकामी करुन भरण्यात येणार आहे.असे सरकारनेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात कबुल केले होते.नंतर मात्र कोरोनाचे कारण पुढे करुन पदभरतीची प्रक्रियाच ठप्प केली.

महाविकास आघाडीचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सन २०२१ पर्यंत विशेष पदभरती करण्याची लेखी हमी दिली होती. पण पदभरती झाली नाही.त्यानंतर वारंवार विधानसभा,विधानपरिषदेत पदभरतीची चर्चा झाली. सरकारने पदभरतीची आश्वासने दिली.पण ती फोल ठरली.

अडीच वर्षानंतर शिंदे - फडणवीस - अजित पवार यांच्या महायुती सरकारने १४ डिसेंबर २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन 'गट क' व ' गट ड ' मधील पदे भरण्याची कार्यवाही ३१ जुलै २०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे आणि शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून एक महीण्यात जाहिरात प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले होते. परंतू राज्यातील शासकीय, निमशासकीय, शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था अशा कोणत्याही आस्थापनेवरील विशेष पदभरतीची एकही जाहिरात आजपर्यंत निघालेली नसल्याचा आरोप ट्रायबल वुमेन्स फोरमने केला आहे.

### आमच्यावरचं अन्याय का ?

ज्या बिगर आदिवासींनी,मूळ आदिवासी जमातींच्या नामसाधर्म्याचा फायदा घेऊन, खोट्या कागदपत्रांच्या आधारे जातीची चोरी करुन बोगस जातप्रमाणपत्र मिळविले अशांसाठी सरकारने जादा पद ( अधिसंख्य ) निर्माण करुन त्यांना सेवेत कायम ठेवले.पण ज्या आदिवासी समाजाची घटनात्मक हक्काची शासकीय सेवेतील राखीव पदे बळकावली होती.ती मात्र गेल्या पाच वर्षात दोन्ही सरकारकडून भरण्यात आलेली नाहीत. या पदांवर बुलडोझर फिरवून बेरोजगार आदिवासी उमेदवारांना नोकरीपासून वंचित ठेवले.

– महानंदा टेकाम राज्यसंघटक, ट्रायबल वुमेन्स फोरम

# बच्चू कडू म्हणतात आमची दोस्ती कायम मात्र राजकुमार पटेल विरोधात उमेदवार देऊ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती**

महायुतीशी बच्चू कडू यांनी काडीमोड घेतला. तिसऱ्या आघाडीच्या जोरावर ते राज्यात वेगळं काही घडवण्याच्या विचारात आहेत. अर्थात महाविकास आघाडीचा त्यांच्यावर विश्वास नाही. तर महायुतीने त्यांच्या मतदारसंघात अडचणींचा डोंगर उभा करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्यांचे अत्यंत विश्वासू सहकारी शिवसेनेकडून त्यांच्याविरोधात उभा ठाकण्याची शक्यता आहे. या सर्व घडामोडींमुळे बच्चू कडू यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आव्हान दिलं आहे.

ही भाजप-शिवसेनेची खेळी

राजकुमार पटेल यांच प्रहार पक्ष सोडण ही भाजप शिवसेनेची खेळी आहे, असा आरोप बच्चू कडू यांनी केला. अजूनही दोन तीन महत्त्वाचे कार्यकर्ते जे जाण्याची शक्यता असल्याचा गौप्यस्फोट त्यांनीच केला.आम्हाला लढण्याची सवय आहे. आधी एक होतो आताही एक आहे. पुन्हा लढू आणि एकाचे दहा निवडणूक आणू. निवडणूक मध्ये हरलो तरी चालेल पण विचारासोबत तडजोड नाही. प्रत्येकाच वैयक्तिक स्वार्थ असत ते त्यांनी करावं. ते तिथे जात आहे त्यांनी तिथे सुखी राहाव.राजकुमार पटेल यांनी सांगितलं की दोस्ती कायम राहील तर आम्ही दोस्ती कायम ठेवून राजकुमार पटेल विरोधात उमेदवार देऊ, असे त्यांनी स्पष्ट केले.

**विदर्भात झटका दाखवू**

भाजप आणि शिवसेना जी खेळत आहे, त्याचा झटका त्यांना विदर्भात दिसेल, असा इशारा कडू यांनी दिला. प्रत्येकाचा राजकीय स्वार्थ असतो त्यामुळे ते जात असेल त्याची आम्हाला परवा नाही आहे त्यांनी सुखात राहावं. राजकुमार पटेल आणि माझे मतभेद असूच शकत नाही राजकुमार पटेल अतिशय दिलदार माणूस आहे. त्यांच्या आजूबाजूच्या लोकांनी केलेलं हे काम आहे, असे ते म्हणाले.

आता आम्ही हजारो घाव देऊ




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्हाला एक घाव केला आम्ही त्याच्या बदल्यात हजारो घाव देऊ. शिंदे गटाला सुद्धा याचे परिणाम भोगायला लावू. त्यांनी एक खेळी खेळली आम्ही दहा खेडी खेळू. त्याचे परिणाम शिंदे गटाला भोगायला लावू अशी भूमिका आम्ही घेऊ, असे कडू यांनी आव्हान दिलं. आम्ही सुद्धा मैत्री कायम ठेवून राजकुमार पटेल यांच्या विरोधात उमेदवार देऊ. आमचे काही पदाधिकारी व आम्हाला आणखी सोडून जातील काही लोक राजकीय हेतूने काही आर्थिक हेतूने सोडून जातील. एकनाथ शिंदे यांनी आम्हाला दिव्यांग मंत्रालय दिलं त्याचं ऋण आमच्यात कायम आहे. पण त्यांनी खेळलेली खेळी त्यांनाच त्यांना घातक ठरणार आहे.

# बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वीजबिलांच्या पावतीचे वितरण

## मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेअंतर्गत आस्थापित कृषिपंपाचे लोकार्पण

विदर्भ प्रजसत्ताक

**दि.७अमरावती –** मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वीजबिलांच्या पावतीचे वितरण आणि मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेअंतर्गत आस्थापित कृषिपंपाचे लोकार्पण मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मा.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मा.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे झाले. पालकमंत्री तथा अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट, खा.भागवत कराड, आ.सतीश चव्हाण, आ.विक्रम काळे, आ.प्रदीप जैस्वाल, आ.रमेश बोरनारे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ना.एकनाथ शिंदे म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेत राज्य सरकारने शेतकऱ्यांचे कृषी पंपांचे चालू बिल भरण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे. आगामी पाच वर्षे सरकार शेतकऱ्यांचे साडेसात एचपीपर्यंतच्या पंपांचे चालू बिल भरेल असा शासन निर्णय जारी झाला आहे. राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. सरकारने एप्रिल ते जून या कालावधीच्या बिलापोटी २७५० कोटी रुपये महावितरणला अदा केल्यामुळे शेतकऱ्यांना महावितरणकडून पावत्या पाठविण्यात येत आहेत. या कार्यक्रमात मा.मुख्यमंत्री आणि मा.उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात पावत्या प्रदान करण्यात आल्या. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याच्या या योजनेत राज्य सरकार कृषी पंपांचे चालू बिल भरत आहे. मा.मुख्यमंत्री तसेच मा. उपमुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांच्या वीज बिलापोटी प्रतिकात्मक धनादेश महावितरणला सुपूर्द केला. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र यांनी हा धनादेश स्वीकारला. यावेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा



शुक्ला उपस्थित होत्या. ना.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेत राज्यातील शेतकऱ्यांना दहा लाख पंप देण्यात येणार आहेत. केवळ दहा टक्के रक्कम भरून शेतकऱ्यांना सौर ऊर्जा निर्मिती पॅनल्स आणि कृषी पंप मिळणार आहे. अनुसूचित जाती व जमातींच्या शेतकऱ्यांना लाभार्थी हिस्सा केवळ पाच टक्के भरावा लागेल. ऊर्वरित रक्कम केंद्र आणि राज्य सरकारकडून अनुदान म्हणून मिळते. शेतकऱ्यांना स्वतंत्र आणि हक्काचे सिंचनाचे साधन सौर कृषी पंपामुळे मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना २५ वर्षे वीजबिल नाही. पाच वर्षांत पंप बिघडला तर दुरुस्त करून मिळणार आहे. तसेच चोरीस गेला किंवा मोडतोड झाला तर त्याचा विमा सरकारने काढला आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत आजतागायत २,०८,९३५ सौर पंप मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी १,६७,१५५ शेतकऱ्यांनी आवश्यक रकमेचा भरणा केला आहे व त्यापैकी ६०,००० सौर पंप आस्थापित करण्यात आले आहेत. यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावला असून, सर्वा धिक पंप या जिल्ह्यात आस्थापित करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० अंतर्गत कालच पंतप्रधानांच्या हस्ते ५ सौर प्रकल्पांचे उद्धाटन झाले. येत्या १८ महिन्यांत शेतकऱ्यांची सर्व वीज सौर ऊर्जेद्वारे पुरवली जाणार आहे. त्यासाठी पहिली कृषा ऊर्जा कंपनी स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. ना.अजित पवार म्हणाले की, राज्य सरकार पुढील ५ वर्षे शेतकऱ्यांचे वीजबिल भरणार आहे. त्यासाठी सरकारने निधी दिला आहे. शेतकऱ्यांना आता शून्य वीजबिले पाठवली जात आहेत. यावेळी मा. मुख्यमंत्र्यां च्या हस्ते अर्जदारांना अर्ज मंजुरीचे व अनुदानाचे एसएमएस पाठविण्यात आले. तसेच मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बटण दाबून आतापर्यंत शेतात बसविलेले ६०,००० सौर कृषी पंप रिमोटद्वारे चालू करून योजनेचे लोकार्पण केले.

# ३२ किलोमीटर वारीः देवीच्या जयघोषाने दुमदुमला सातपुडा पर्वत

## परतवाडा ते चिखलदरा पदयात्रेत भाविकांची मांदियाळी

***विदर्भ प्रजासत्ताक***

***दि.७ चिखलदरा* :** १४,१५पर्यटनस्थळावरील देवी पॉइंट येथील देवीच्या दर्शनासाठी परतवाडा ते चिखलदरा अशा ३२ किलोमीटर पदयात्रेत शेकडो भाविकांनी हजेरी लावली होती. यंदा सोळावे वर्षे होते. परतवाडा शहरातील नवरंग नवदुर्गा उत्सव मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे ही पदयात्रा ठेवण्यात येते. या वेळी रस्त्याने विविध उपवासाच्या खिचडीसह स्टॉल लावण्यात आले होते. पिण्याच्या पाण्यासह डॉक्टर व पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पदयात्रेमध्ये परतवाडा शहरासह अचलपूर तालुक्यातील अनेक गावांमधील नागरिक या पदयात्रेतसहभागी होतात. ही पदयात्रा परतवाडा शहरातून सकाळी ५ वाजता सुरू झाली. परतवाडा ते चिखलदरा ३२ किलोमीटर पायदळ यात्रा होती, तर काही लोक इतर ठिकाणावरून येणारे लोक ५० ते ६० किलोमीटर चालूनसुद्धा आले होते. या यात्रेमुळे चिखलदरा ही पर्यटननगरी 'जय माता दी'च्या जयघोषाने दुमदुमली होती. भाविक भक्तांसाठी दानदात्यांमार्फत अनेक ठिकाणी उपवासाच्या पदार्थाचे ३० ते ३५ स्टॉल चिखलदरा ते परतवाडा मार्गावर लावण्यात आले होते.

परतवाडाच्या नवरंग मंडळातर्फे अरुण घोटकर, ॲड. अभिषेक चव्हाण, अजय जैन, जितेंद्र उदापूरकर, राजा जयस्वाल, सनी यादव, गुड्डू पांडे,गौरीशंकर श्रीवास आदी पदाधिकाऱ्यांनी तसेच





चिखलदराच्या वतीने रूपेश चौबे, अरुण सपकाळ, मनोज शर्मा, राजेंद्रसिंह सोमवंशी, अरुण तायडे, जितेंद्र पचौरी, शैलेश पाल, सुनील लादे, हिरुजी हेकडे, ओमप्रकाश मिश्रा, मंगेश लवणकर, आशिष पाल आदी पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

पदयात्रेदरम्यान आ. राजकुमार पटेल, माजी खासदार नवनीत राणा, माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, निवृत्त महसूल अधिकारी रमेश मावसकर, माजी आमदार केवलराम काळे आदी पदाधिकारी यात्रेत सहभागी झाले होते. त्यांनी देवीचे दर्शन घेतले.

# साबनपुरा परिसरातून ९ लाख रुपयांचा गुटखा जप्त

## सोनपापडी च्या आड चालायचा गुटखा विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांचा स्पेशल स्कॉड म्हणजे सीआययू पथकाने आज ६ ऑक्टोंबर रोजी दुपारी साबणपुऱ्यातील एका व्यापाऱ्याच्या घरातून तब्बल ९ लाखांचा गुटखासाठा जप्त केला आहे. आरोपी हा सोनपापडी

व्यवसायाच्या आड अवैध गुटख्याची होलसेल विक्री करित होता.

श्रीनिवास राधाकिसन झवंर (५६) रा.साबणपुरा असे गुन्हे दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.श्रीनिवास झवंर यांचे साबणपुऱ्यात दुमजी घर असून ते पत्नीसह पहिल्या माळ्यावर राहतात. तळ मजल्यावर त्यांचे सोनपापडीच्या होलसेल वरिटेल विक्रीचे दुकान आहे. श्रीनिवास झंवर हेसोनपापडी व्यवसाच्या आडमध्ये अवैध गुटख्याची होलसेल विक्रीकरित असल्याची गोपनीय माहिती सीआययू पथकाचे एपीआय महेंद्र इंगळे यांना मिळाली. त्यानंतर ६ ऑक्टोंबर रोजी दुपारी श्रीनिवास झंवर यांच्या घरी धाड टाकली असता पोलिसांना त्यांच्या घरातून तब्बल ९ लाख १ हजार ९६० रूपयांचा विविध प्रकारच्या गुटख्याचा साठा मिळून आला. १५ ते १६ विविध कंपनीचा महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा, खर्रा, संगुधीत तंबाखूचा साठा आहे. श्रीनिवास झवंर यांची चौकशी केली असता बडनेरा येथील चाँद नामक व्यक्तीकडून हा माल विकत घेतला असल्याचे श्रीनिवास यांनी सीआययू पथकाला सांगितले. विविध पानठेल्यावर या मालाचा पुरवठा होत असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यानुसार पोलिसांनी श्रीनिवास यांच्या घरातील संपूर्ण ९ लाखाचा गुटख्याचा साठा जप्त करून श्रीनिवाससह बडनेरा येथील शेख चांद यांच्याविरोधात खोलापुरीगेट पोलिस ठाण्यात संबधीत कलमान्वे गुन्हे दाखल केले आहे.



श्रीनिवास हे आजारी असल्याने पोलिसांनी त्यांना अटकेची नोटीस देऊन रूग्णालयातून सुट्टी मिळताच खोलापुरीगेट पोलिसांसमोर हजर राहण्याची लेखी ताकिद दिली आहे.

या कारवाईत वेगवेगळ्या कंपनीचा पानमसाला बाजीराव गोल्ड, पान रसीया पान मसाला, सुगंधीत तंबाखु मस्ताणी ब्रांड, पानमसाला नागपुरी प्रिमीयम, पानमसाला विमल, पानमसाला बाजीराव गोल्ड निळी, गुटखा नजर ९०००, गुटखा नजर ५०००, गुटखा नजर १०००, गुटखा नजर प्रिमीयम, पानमसाला पानबहार, पानपराग प्रिमीयम पान मसाला, पानमसाला जॅकपॉट ७७७, पानमसाला विमल झिपर, सुगंधीत तंबाखु ११ असा एकुण ९,०१,९६०/-रु.चा माल जप्त करण्यात आला.

### कारवाई करणारे पथक

ही कार्यवाही नविनचंद्र रेड्डी, (पोलीस आयुक्त अमरावती शहर) गणेश शिंदे (पोलीस उपायुक्त परि.२ अम.), वरीष्ठ पोलीस निरीक्षक गौतम पाथारे यांच्या मार्गदर्शनात क्रिमीनलइंन्टेलीजन्स युनिटमधील प्रभारीस.पो.नि. महेन्द्र इंगळे, स. फौ. विनय मोहोड, पो.हे.का. सुनिल लासुरकर, जहीर शेख, ना.पो.शि. अतुल संभे, पो.शि. राहुल देंगेकर, विनोद काटकर यांनी केली

# आमदार यशोमती ठाकूर यांच्या हस्ते लाखोंच्या विकास कामांचे भूमिपूजन

## भातकुली तालुक्यातील २८० लाखांच्या प्रलंबित विकास कामांना गती मिळाल्याने नागरिक सुखावले

**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.७ अमरावती-** काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री व आमदार यशोमती ठाकूर यांनी भातकुली तालुक्यातील २८०लाखांच्या प्रलंबित विकास कामांना गती देत तालुक्यातील जळका, टाकरखेडा शम्भू , साऊर, रामा, पोहरापूर्णा, पूर्णा नगर, अ ंचलवाडी, निरूळगंगामाई,वाकी व ढंगारखेडा येथील विविध विकास कामांचे भूमिपूजन केले. यावेळी गाव-खेड्यातील विविध प्रलंबित विकास कामांना गती मिळाल्याने स्थानिक नागरिकांनी यशोमती ठाकूर यांचे आभार मानले व पुढील कामांसाठी आशीर्वाद दिला. शुक्रवार (ता.५) रोजी विविध मान्यवर व स्थानिक नागरिकांच्या लक्षणीय उपस्थितीत आमदार यशोमतीताई ठाकूर यांच्या हस्ते भातकुली तालुक्यातील जळका येथे ५२ लाख रुपये, टाकरखेडा शम्भू येथे २० लाख, साऊर येथे २० लाख, रामा येथे ६४ लाख, पोहरापूर्णा येथे ५३ लाख, पूर्णा नगर येथे ३४ लाख, अंचलवाडी येथे १० लाख, निरूळगंगामाई येथे २० लाख,वाकी येथे १७ लाखांच्या व ढंगारखेडा येथील १० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी काँग्रेस नेते श्री. हरिभाऊ मोहोड, श्री. जयंतराव देशमुख, श्रीकांत बोंडे, अभय देशमुख, मकद्दर पठान, नरेंद्र मकेश्वर, अभय वंजारी, रेखाताई सरोदे, अंकुश जुनघरे, प्रदीप शेंडे, विजुभाऊ मकेश्वर, वैकुंठ देशमुख, गजानन लांजेवार, गजुभाऊ ठाकूर, सलिमभाई, आबिदभाई, प्रभाकरराव धंदर, संजय खोडस्कर, दिलीप डहाके, मनिष देशमुख, दिलीप म्हस्के व नागरिक तथा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सरकारच्या निर्णयानंतर खाटीक समाजातर्फे जल्लोष

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन, गुलाल उधळून केली आतषबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती**

महाराष्ट्रातील सर्व हिंदू खाटीक समाज बांधवांसाठी महायुती सरकारने हिंदू खाटीक आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे खाटीक नमाजाकडून जोरदार स्वागत करण्यात येत नाहे. अमरावतीच्या डॉ. बाबासाहेब नांबेडकर चौक येथे विदर्भ खाटीक समाज सेवा मितीचे पदाधिकारी व सदस्यांनी महामानव १. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन व लाल उधळून व फटाक्यांची आतषबाजीने लोष केला.

समाजातील सामाजिक, आर्थिक समतोल राखण्याच्या दृष्टीने हिंदू खाटीक समाज विकास महामंडळाला राज्य सरकारने मंजुरी दिलेली आहे. या बाबतीत महाराष्ट्रातील सर्व संघटनांनी सरकारकडे पाठपुरावा केला होता. अमरावती जिल्ह्यातील विदर्भ खाटीक समाज सेवा समिती यांनी खाटीक समाजाकरिता खाटीक समाजाचे महामंडळ असावे, याबाबत सतत पाठपुरावा केला तसेच मुंबई येथे समितीच्या पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांनी महायुतीतील नेतेमंडळी व प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन हिंदू खाटीक समाजाला महामंडळाची आवश्यकता का आहे, याबाबत त्यांना अवगत केले व निवेदने दिली होती. याची प्रचिती म्हणून ४ ऑक्टोबरच्या मंत्रिमंडळाच्याबैठकीमध्ये हिंदू खाटीक समाजाला महामंडळ मिळण्याच्या दृष्टीने मंजुरी देण्यात आली. विदर्भ खाटीक समाज सेवा समितीने राज्यातील तमाम हिंदू खाटीक बांधवांतर्फे महायुती सरकारचे अभिनंदन तसेच आभार मानण्यात आले. विदर्भ खाटीक समाजसेवा समिती अमरावतीकडून घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण व अभिवादन करण्यात आले. गुलाल उधळत फटाक्यांची आतिषबाजीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. अमरावती जिल्ह्यातील महायुतीचे नेते माजी आमदार प्रवीण पोटे व तुषार भारतीय यांचे आभार मानून त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विदर्भ खाटीक सेवा समितीचे अध्यक्ष सुधीर लसणकर, सचिव राजाभाऊ लोयटे, कोषाध्यक्ष गणेश नेहर, श्रीराम नेहर, भीमराव माकोडे, सुरेश वानखडे, दीपक घन, गोपाल हरणे, रमेश खंडार देविदास कुरेकर, लक्ष्मणराव कराळे, देविदास माहुरे, अविनाश हिरेकर, किशोर दुर्गे, ज्ञानेश्वर माहूरकर, निर्मलाताई पारधे, राजकुमार दुर्गे, मनोहर सदाफळे, विजय विलेकर, विश्वेश्वर विरूळकर, विठ्ठलराव मदने, सुनील कुरेकर, राजेश बिहार, संजय शेंडे, किसन माकोडे, उत्तमराव लोणारकर, वर्षा माहूरकर, पुनम माकोडे, ममता सदाफळे, माकोडे मॅडम, सुनील माकोडे तसेच समितीचे आजीवन सदस्य उपस्थित होते.-

# केंद्र पुरस्कृत ५० टक्के अनुदान योजनेमध्ये धनगर समाजातील तरुणांना २५ टक्के अतिरीक्त अनुदान द्यावे

## मेंढपाळ धनगर विकास मंचच्या संतोष महात्मेंची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती-** केंद्र पुरस्कृत ५० टक्के अनुदान योजनेमध्ये, धनगर समाजासाठी आदिवासी योजनांच्या धरतीवर राबविण्यात येणाऱ्या १००० कोटी रुपयांच्या योजनेमधून २५ टक्के अतिरिक्त धनगर समाजातील तरूण बेरोजगाराना अनुदान उपलब्ध द्यावे, अशा मागणीचे निवेदन संतोष महात्मे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिले.







केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये नॅशनल लाईव्हस्टॉक मिशन ही योजना मोठ्या प्रमाणातराब विण्यात येत आहे. या योजने मधून दुधाळ जनावरे, शेळी व मेंढी तथा कुक्कुटपालन इत्यादी योजने करिता ५०टक्के अनुदान देण्यात येते. केंद्र पुरस्कृत एनएलएम योजनेअंतर्गत सहभागी होण्याकरिता ५० टक्के अनुदान असून उर्वरित स्व निधी अथवा बँक कर्जा मधून रक्कम उभी करावयाची आहे. इतर मागासवर्गीय विभागाच्या वतीनेराबविण्यात येणाऱ्या सदर १ हजार कोटीच्या योजनेमधून केंद्र पुरस्कृत एनएलएम योजनेमध्ये राज्य सरकार च्या वतीने अतिरिक्त २५ टक्के अनुदान देण्यात यावे अशी मागणी संतोष महात्मे यांनी केली आहे.

# मध्यप्रदेशातील जंगलात वाघाचा संशयास्पद मृत्यू

## मेळघाटमधून स्थलांतरित झाल्याची शक्यता



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७मेळघाट -** धारणी तालुक्यात सीमालगत जवळच असलेल्या बुरहानपुर जिल्ह्यातील नेपानगर भागाचे सातपुडाच्या जंगलात दोन दिवसांपूर्वी वाघ मरण पावल्यने एकच खळबळ उडाली आहे. मेळघाटला लागून असलेल्या खकनार व नेपानगरच्या जंगलात पट्टेदार वाघाची नोंद नसल्याने मृत वाघ मेळघाटच्या जंगलातून फिरत फिरत भटकून आल्याची शक्यता मध्यप्रदेश वनमंडळाने व्यक्त केली आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प तथा प्रादेशिक वनविभागाच्या जंगलाला लागून असलेल्या मध्यप्रदेशातील बुरहानपुर वनविभागाच्या नेपानगर रेंजच्या हसबपुरा गावालगतच्या जंगलात शुक्रवारी अंदाजे दहावर्षवयाचावाघ मृताअवस्थेत दिसला. डी.एफ.ओविजयसिंह, रेंजर श्रीराम पांडेय, मुख्य संरक्षक रमेश गणावर, एसडीओ मानसिंग खराडीसह अनेक अधिकाऱ्यांनी मोक्यावर भेट दिली. महाराष्ट्रातील काही वन अधिकारी पण मोक्यावर पोहचले असल्याची अधिकृत माहिती आहे. मात्र, या विषयी प्रतिनिधी रवि नवलाखे यांनी वन्यजीव विभाग, अकोट आणि धारणीतील अधिकारीसोबत बोलून माहिती घेतली असता वाघाच्या मृत्यू माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले.

जंगलात ड्रोनने सर्चिंग : नेपानगरच्या जंगलातून अत्याधुनिक ड्रोनव्दारे सर्चिंग करण्यात आली. पण शिकार झाल्याचा पुरावा नमिळाल्याची माहिती असून वाघाच्या मिशा, दात, नखांसह सर्व अवयव साबुत आढळून आली. प्राकृतीक स्वरूपात मरण झाल्याचे प्रथम दर्शनी वाटत असले तरीमृत वाघाचे पोट रिकामे होते, अशी गंभीर माहिती आहे. म्हणजे वाघकुपोषित होता, असा अंदाज आहे. शिकारच्या शोधात भटकून नेपानगरच्या जंगलात पोहचल्याचा प्राथमिक अनुमान आहे. एका माहितीप्रमाणे मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून शिकाराच्या शोधात किंवा जंगलात भटकून अनेकप्राणीबुरहानपुर वन मंडळाच्या जंगलात येत असतात. मागील वर्षी पण नेपानगरच्या जंगलात एका वाघाचा मृतदेह आढळला होता. हसनपुरच्या वनकक्ष क्रमांक १९७ मध्ये मृत सापडलेल्या वाघाचे शवविच्छेदन शनिवारी तज्ज्ञांनी केल्यावर विसेरा सुक्ष्म तपासणीसाठी इंदोरला पाठविण्यात आला. प्रथमदर्शनी अनुमान लावले जात आहे की, चार दिवसांपूर्वीच वाघालाप्राकृतीक किंवा भुकेमुळेमरण आले असावे, सन अशी की, तारातांडा जवळच्या मध्यप्रदेशच्या जंगलाचा परिसर नव्याने वाघ परियोजनेत रेखांकित करण्यात आलेला आहे, हे विशेष.

# अल्पसंख्यांक बहुल योजनेतून मोर्शी मतदार संघांमध्ये ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर !

## आमदार देवेंद्र भुयार यांचे नागरिकांनी मानले आभार !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ मोर्शी** -मोर्शी वरूड तालुक्यात असलेल्या अल्पसंख्याकबहुल असलेल्या नागरिकांना पायाभूत सुविधा मिळाव्यात, अल्पसंख्याक वस्त्यांचा विकास व्हावा आणि त्या ठिकाणी राहणार्या नागरिकांचे जीवनमान उंचावे यासाठी मोर्शी वरूड तालुक्यातील १५ अल्पसंख्याकबहुल ग्रामपंचायतीला प्रत्येकी २० लाखांचा निधी आमदार देवेंद्र भुयार यांच्या प्रयत्नाने विशेष बाब म्हणून मंजूर झाल्याने मोर्शी वरूड तालुक्यातील जवळपास १५ ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात येत असलेल्या अल्पसंख्याकबहुल वस्त्यांचा ३ कोटी रुपयांच्या विकासकामातून आता विकास होणार आहे.

अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देऊन ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्यांक लोकसमूहातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी शासनाने अल्पसंख्यांक बहुल योजना आमदार देवेंद्र भुयार यांनी राबवली आहे.

त्या योजनेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मोर्शी विधानसभा मतदारसंघांमध्ये या योजनेतून विविध विकास कामासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार देवेंद्र भुयार यांनी दिली आहे.

वरुड व मोर्शी तालुक्यातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामीणभागातील पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विकास कामांना प्रशासकीय मान्यताआमदार देवेंद्र भुयार यांच्या विशेष प्रयत्नाने मिळाली असून येथे शादिखाना / कब्रस्तान / ईदगाह येथे टिनशेड बांधकाम व इतर अनुषंगिक कामे करणे केल्या जाणार असून गव्हाणकुंड २० लक्ष रुपये, रिद्धपूर २० लक्ष रुपये, पुसला २० लक्ष रुपये, बेनोडा, २० लक्ष रुपये, आमनेर २० लक्ष रुपये, पिंपळखुटा मोठा



२० लक्ष रुपये, जरुड २० लक्ष रुपये, कुरळी २० लक्ष रुपये, शहापूर २० लक्ष रुपये मांगरुळी २० लक्ष रुपये, वघाळ २० लक्ष रुपये, लोणी २० लक्ष रुपये, हिवरखेड , २० लक्ष रुपये, अंबाडा २० लक्ष रुपये, खेड २० लक्ष रुपये या सर्व विकास कामांसाठी ३ कोटी रुपयांचा निधी आमदार देवेंद्र भुयार यांनी मंजूर करून दिल्याबद्दल संपूर्ण गावातील नागरिकांनी आमदार देवेंद्र भुयार यांचे आभार मानले. आमदार देवेंद्र भुयार यांच्या प्रयत्नाने मोर्शी विधानसभा क्षेत्रातील अल्पसंख्याक लोकसमुहातील नागरिकांच्या विकास कामां करीता तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आपल्या विधानसभा क्षेत्रातील सर्व समुदायातील नागरिकांनानागरी सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्या याकरिता आमदार देवेंद्र भुयार यांचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

### अभ्यासू व चाणक्य बुद्धिमत्तेमुळे मतदार संघामध्ये ४ हजार ३७२ कोटींचा निधी

अनेकांना ज्या योजना माहिती नाहीत त्या योजने मधून आमदार देवेंद्र भुयार यांनी प्रत्येक ठिकाणी भरघोस निधी दिला आहे त्यांच्या अभ्यासू व चाणक्य बुद्धिमत्तेमुळे मोर्शी वरूड मतदार संघामध्ये ४ हजार ३७२ कोटी रुपयांचा निधी आला असून विकास काय असतो हे त्यांच्या विकास कामातून दिसून येत आहे.- **रुपेश वाळके** तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस मोर्शी तालुका .

# अमरावतीसह बडनेरावासीयांना नागपूर मुंबई, पुणे येथे जाण्यास झाली सुविधा

## दसरा, धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ६ विशेष रेल्वे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ बडनेरा**

मध्य रेल्वेने १२ ऑक्टोबरला दसरा (विजयादशमी) व धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून मुंबई–पुणे ते नागपूर आणि नागपूर –भुसावळ – नाशिक रोड दरम्यान ११ ते १३ ऑक्टोबरदरम्यान विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. एलटीटी ते नागपूर अनारक्षित विशेष रेल्वे क्र. ०१०१७ ही ११ ऑक्टो. एलटीटी मुंबई येथून दु.२ वाजता निघेल व नागपूर येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता पोहोचेल. ही रेल्वे ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिकरोड, मनमाड,




चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, चांदूर रेल्वे,धामणगाव, पुलगाव, वर्धा, सिंदी आणि अजनी हे थांबे घेणार आहे.

नागपूर – एलटीटी विशेष रेल्वे क्र. ०१०१८ ही १३ रोजी नागपूर येथून रात्री १२.२० वाजता निघेल व त्याच दिवशी एलटीटी, मुंबई येथे रात्री ७ वाजता पोहोचेल. नागपूर एलटीटी विशेष रेल्वे क्र. ०१२१८ ही १२ रोजी नागपूरहून रात्री १०.०५ वाजता निघेल व एलटीटी येथे दुसऱ्या दिवशी दुपारी २.३५ वाजता पोहोचेल. मार्गात सिंदी, सेवाग्राम, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, नांदुरा, मलकापूर, भुसावळ, कल्याण आणि ठाणे येथे थांबा घेईल.नागपूर – पुणे अनारक्षित विशेष गाडी क्र. ०१२१५ ही १२ रोजी नागपूर येथून रात्री ११ वाजता निघेल व पुणे येथे दुसऱ्या दिवशी रात्री ८ वाजता पोहोचेल. पुणे – नागपूर अतिजलद विशे, ०१२१६ ही विशेष रेल्वे पुणे येथून ११ रोजी दु. ४ वाजता निघेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ६.४५ वाजता पोहोचेल. या दोन्ही रेल्वे अजनी, सिंदी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, नांदुरा, मलकापूर, भुसावळ, जळगाव, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर आणि दौंड कॉर्ड लाइन, हे थांबे घेतील.

भुसावळ–नागपूर– नाशिक रोड विशेष मेमू क्र.०१२१३ ही १२ रोजी भुसावळ येथून पहाटे ४.२५ वाजता निघेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी दु. १२ वाजता पोहोचेल. तसेच विशेष मेमू क्र. ०१२१४ ही १२ रोजी नागपूर येथून रात्री ११.४० वाजता निघून नाशिकरोड येथे दुसऱ्या दिवशी दु. २.१० वाजता – पोहोचेल. मार्गात ही मेमू मलकापूर, नांदुरा, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, डबडनेरा, चांदूर, धामणगाव, नी पुलगाव, वर्धा, सेवाग्राम, सिंदी आणि अजनी येथे थांबे घेणार आहे. या विशेष गाड्यांचे आरक्षण सर्व संकेत स्थळावर उपलब्ध राहणार आहे.

# नवरात्रआदी शक्तीचा जागर व समृद्धीचा उत्सव – प्रविण पोटे पाटील



**भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी अमरावती शहरातील विविध ठिकाणी विराजित सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळला भेट दिली तसेच आदिशक्ती चे मनोभावे दर्शन घेत आरती मध्ये सहभाग घेतला.नऊ दिवस आपण देवीची नऊ रूपे पाहत असतो या रुपांच्या माध्यमातून जीवनाचे पूर्णत्व आपल्याला अनुभवायला मिळते. शक्तीचा जागर आणि समृद्धीचा उत्सव असलेल्या नवरात्र उत्सवात बालगोपालांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाचा उत्साह वाखाणण्याजोगता आहे. सर्वांची दुःख हरून त्यांच्या आयुष्यात सुख, समृध्दी, ऐश्वर्य नांदो ही प्रार्थना आदिशक्ती कडे केल्याचे प्रतिपादन मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी केले. यावेळी तुषार भारतीय, चेतन पवार, कौशिक अग्रवाल, धीरज बारबुद्धे, ऋषिकेश देशमुख, धनराज चक्रे उपस्थित होते**

# २ हजार ६७७ लाडक्या बहिणीचे अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित

## जिल्ह्यामधील ६ लाख ८९ हजार महिलांचे अर्ज मंजूर



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

जिल्ह्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत आतापर्यंत ७ लाख ३ हजार ४३६ लाडक्या बहिणींनी अर्ज दाखल केले. यामधून ६ लाख ८९ हजार ४९६ अर्ज मंजूर झाले आहेत. याशिवाय २ हजार ६७७ अर्ज पडताळणीमध्ये आहे.

जिल्ह्यात पहिल्या टप्प्यामध्ये नारीशक्ती ॲपवर ३ लाख ९८ हजार ३४९१ महिलांनी अर्ज केले होते. त्यानंतर अंगणवाडी सेविकांच्या पोर्टलवरून २ लाख ९१ हजार १५५ महिलांनी पुन्हा या योजनेसाठी नोंदणी केली आहे. त्यामुळे आतापर्यंत ७ लाख ३ हजार ४३६ महिलांनी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केले आहे. यापैकी आतापर्यंत ६ लाख ८९ हजार ४९६ महिलांचे अर्ज मंजूर करण्यात आले. यापैकी ३ हजार २४२ महिलांचे अर्ज फेटाळण्यात आले, तर २ हजार ६७७ हजारांवर अर्ज पडताळणीमध्ये आहे. दरम्यान पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातही महिलांच्या खात्यात पैसे जमा करण्यात आले. परंतु हजारोंच्या संख्येत महिलांच्या खात्याचे आधार सिडींग आहे, तरीही पैसे जमा न झाल्याने महिलांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. निवडणुकीपूर्वी पैसे येतील की नाही, अशी भीती या लाडक्या बहिणींमध्येनिर्माण झाली आहे.

### संभ्रमात असलेल्या लाडक्या बहिणीसाठी मदत केंद्रच नाही

महिलांना अर्जाबाबत तक्रारी करण्यासाठी महिला व बालविकास विभागात मदत केंद्र सुरू केले होते. परंतु ज्यांचे पैसे प्राप्त झाले नाही. त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कोठेही मदत केंद्र उपलब्ध नाही. आधार सिडींग आहे, अर्ज देखील मंजूर आहे. तरीही महिनाभरापासून एकही हप्ता पोहोचला नाही, त्या महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी कोठेही या विभागाकडून सुविधा उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे त्यांनी कोठे जावे, कोणाला विचारावे, पैसे येतील की नाही असाही संभ्रम या महिलांमध्ये निर्माण झाला आहे.

### पैशांबाबत बँकेत चौकशी करा

कुणाचे पैसे जमा झाले की नाही, याची सिस्टिम पोर्टलवर कोठेही नाही, त्यामुळे पैसे का आले नाही हे आम्हाला सांगता येणार नाही. त्यांनी बँकेत चौकशी करावी.

**कैलास घोडके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालविकास विभाग.**

# नागपुरी गेट; दंगलखोरांचे सर्चिंग ऑपरेशन जोरात, शेकडो आरोपी अंडर ग्राऊंड

## २३ अटक, सहा आरोपींना पीसीआर : १७ जण पोहोचले तुरुंगात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

ठाण्यावरील दगडफेकप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत २३ आरोपींना अटक केली आहे. उर्वरित आरोपींची धरपकड करण्यासाठी सर्चिंग सुरू असून, अटकेच्या भीतीने शेकडो आरोपी अंडरग्राऊंड झाले आहेत.

गाजियाबाद येथील महंत यती नृसिंहानंद यांच्याविरुद्ध एफआयआर करणे सुरू असताना त्यांना अटक करण्याची मागणी करीत विशिष्ट धर्मीय जमावाने शुक्रवारी रात्री नागपुरी गेट ठाण्यावर तुफान




दगडफेक केली. याप्रकरणी शनिवारी गुन्हा दाखल झाला. नागपुरी गेट पोलिस व गुन्हे शाखेने शनिवारी व रविवारी २२ आरोपींना अटक केली असून, पैकी पाच आरोपींना रविवारी न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली. तर, १७ जणांची कारागृहात रवानगी करण्यात आली तर आधी अटक केलेल्या एका आरोपीला न्यायालयाने शनिवारीदुपारी दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. अ. साकिब (२०, सागर नगर), मो. वसीम (३१, गौस नगर), मो. बेग रशीद बेग (२७), शेख जुनैद (२४), सै. इमरान सै. पाशा (२७), मुस्तकिम शहा शफाकत शहा (३५), शे. तौसिफ शे. नाजीम (२२, सर्व रा. लालखडी), शेख जुनैद शेख युसुफ (२८, इंदल), अनिकेत चंदेल (२७, हनुमान नगर), मो. मुजबिल (२६, अन्सारनगर), असलम खान अहेमद खान (२५), इरफान खान रहेमान खान (३५, दोघेही रा. रहेमत नगर), शे. अहमद शे. इस्माईल (३०, अकबर नगर), मोहसिन खान (२३, गुलजार नगर), सै. जमिर सै. जमिल (२८, रा. करजगाव), अ. साजिद अ. साबिर (३०) व लियाकत अली अमानत अली (२८, दोघेही रा. अलिम नगर) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

# अंजनगाव तालुका शेतकरी संघटनेचे ठिय्या आंदोलन सुरूच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अंजनगाव सुर्जी**

या वर्षी अतिवृष्टीमुळे उडीद, सोयाबीन, मूग, कपाशी, संत्रा, केळी, लिंबू या पिकांचे अतोनात नुक्सान झाले आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याद्वारे नुकसान भरपाई मिळावी म्हणून अंजनगाव – सुर्जी तालुका शेतकरी संघटनेचे चार दिवसांपासून कृषी कार्यालया समोर ठिय्या आंदोलन सुरू आहे.



आंदोलनाचा रविवारी चौथा दिवस होता. सोमवारी (दि. ७) शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित बहाळे व अकोला ५ जिल्हा संघटनेचे माजी जिल्हाप्रमुख सतीश देशमुख, अमरावती जिल्हा शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माधवराव गावंडे, न माजी पं. स. सदस्य महेश खारोडे हे सहभागी होणार असून, ते या आंदोलनालामार्गदर्शन करतील. विविध पक्षांचे पदाधिकारी, प्रहार संघटनेचे कार्यकर्ते आंदोलनस्थळी भेटी देत आहेत. यापुढेही हे ठिय्या आंदोलन बेमुदत सुरू ठेवण्याचा शेतकऱ्यांनी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निर्धार केला आहे. हा प्रश्न त्वरित सोडवला नाही तर शेतकरी संघटना यापुढे उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा चर्चेदरम्यान तहसीलदार, कृषी अधिकारी व ठाणेदारांना देण्यात आला. संघटनेचे तालुकाध्यक्ष संजय हाडोळे, स्वतंत्र भारत पक्ष तालुकाध्यक्ष गजानन पाटील दुधाट, सुनील पाटील साबळे यांनी तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. आंदोलनस्थळी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व बहुसंख्येने शेतकरी बांधव उपस्थित आहेत.

# आ.यशोमती ठाकूर यांनी घेतली ग्रंथालय संघाच्या मागण्यांची तात्काळ दखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नांदगाव पेठ**

सार्वजनिक वाचनालयाच्या ३२ व्या वर्धापनदिनानिमित्य ग्रंथालय संघाच्या वतीने खा. बळवंत वानखडे व आ. यशोमती ठाकूर यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते. आ. यशोमती ठाकूर यांनी ग्रंथालय संघाच्या समस्या समजून घेत तात्काळ त्यांच्या निवेदनाची दखल घेतली व मुख्यमंत्र्यांकडे याबाबत पाठपुरावा करून ग्रंथालय संघाच्या उचित



मागण्यांची पूर्तता करण्यात यावी अशी विनंती करण्यात आली. ग्रंथालय संघाने आपल्या निवेदनात ग्रंथालयाची ४०% अनुदान वाढ त्वरित द्यावी,२०१२ पासून रोखलेली दर्जा वाढ देऊन वाचनालये वृद्धिंगत करावी, नवीन ग्रंथालयांना त्वरित मान्यता द्यावी, उच्चविद्याविभूषित ग्रंथालय कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समाविष्ट करावे इत्यादी मागण्या नमूद केल्या होत्या.ग्रंथालय संघाचे किरण खोत यांच्या नेतृत्वात विनोद मुंदे, सौरभ मालवीय, प्रवीण गडीकर, श्रीकृष्ण गभने, शेख उमर सर, विवेक बिंड, दीपक पोकळे, मुरलीधर वनवे, शिंगणे काका व बाभुळकर यांनी आ. यशोमती ठाकूर यांना निवेदन सादर केले होते.

१ ऑक्टोबरला सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने पोस्टर प्रदर्शनीचे उद्घाटनाच्या निमित्ताने या कार्यक्रमाकरिता खास करून आलेले महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार, विभागीय संघाचे अध्यक्ष वाहुरवाघ यांनी उद्घाटनानंतर संजय धर्माळे यांनी देखील आ. यशोमती ठाकूर यांची निवासस्थानी भेट घेऊन निवेदन दिले होते.आमदार, खासदारांनी या मागण्या सोडविण्याकरिता आम्ही कटिबद्ध आहोत या शब्दात जाहीरपणे सर्वांना विश्वास दिला होता.४ ऑक्टोबर रोजी आमदारांनी मुख्यमंत्र्याकडे याबाबत पाठपुरावा केला या पत्राची साक्षांकित प्रत ग्रंथालय संघाकडे पाठविल्यामुळे समस्त ग्रंथालय पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाधान व आनंद व्यक्त करीत आमदारांचे आभार मानले.

# पत्रकारांच्या घराकरिता शासकीय जमिन उपलब्ध करून द्या

## ज्येष्ठ पत्रकार अनिल अग्रवाल यांची उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावती शहरातील पत्रकाराच्या घराचा मुद्दा दीर्घ काळापासून प्रलंबित आहे. त्यामुळे अद्यापपर्यंत पत्रकारांना घरे उपलब्ध होऊ शकली नाही. ज्येष्ठ पत्रकार अनिल अग्रवाल यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पत्रकाराच्या घराचा मुद्दा त्वरित निकाली काढण्याकरिता शासकीय जमिन उपलब्ध करून देण्याची मागणी केली. शनिवारी (ता. पाच) सकाळी वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथे जाण्याकरिता विशेष



विमानाने बेलोराविमानतळ येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले असता अनिल अग्रवालयांनी त्यांची भेट घेत पत्रकारांच्या प्रश्नांवर चर्चा केली. यावेळी अनिल अग्रवाल यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री काळात अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनला निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मराठी पत्रकार संघाकडून आभार व्यक्त केले. याचवेळी त्यांनी पत्रकारांच्या घरांचा प्रश्न सोडविण्याकरिता शासकीय जमिन उपलब्ध करून देण्याची मागणी केली. उपमुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

# महिलांचा जिल्हास्तरीय मेळावा.....



उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते सायन्स स्कोर मैदान येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, महिला सशक्तीकरण योजना व महिलांच्या संबंधी इतर योजनांबाबत जिल्हास्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास महिलांची मोठी गर्दी होती यावेळी उत्कृष्ट काम करण्याऱ्या अंगणवाडी सेविकांचा सन्मान करण्यात आला त्यानंतर नवतेजस्विनी उद्योजिका यांचा सत्कार यावेळी करण्यात आला महिला बचत गटाला धनादेश वाटप पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते करण्यातआला.


## मेळघाट,अचलपूर,तिवसा आणि दर्यापुरात केवळ भाजपाचाच उमेदवार

### राजकुमार पटेल यांचे नाव न घेता नवनीत राणा यांची अप्रत्यक्षपणे टिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ दर्यापूर**

कोणताही आमदार कुठल्याही पक्षात गेला तरी मेळघाटात फक्त भाजपचाच उमेदवार राहणार,मेळघाट असो वा दर्यापूर,अचलपूर असो किंवा तिवसा केवळ आणि केवळ कमळ चीन्हाचाच उमेदवार राहील आणि तोच निवडून येईल असा विश्वास माजी खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी व्यक्त केला.

अमरावती जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीचे वारे जोमाने वाहात असून आता स्वतःचा स्वार्थासाठी मेळघाटातील एका आमदाराने आपला पक्ष बदलला असून काहीही केले तरी मेळघाटात कमळ या चिन्हाचाच उमेदवार भारतीय जनता पार्टी देईल असा विश्वास माजी खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी पदाधिकारी व कार्यकर्ता यांना देवून त्यांच्या मनातील संभ्रम दूर केला,तसेच गेल्या १० वर्षापासून दर्यापूर मतदारसंघातून गायब असणारे आणि लोकसभेत भाजपसोबत गद्दारी करणारे आता आपल्यालाच तिकीट मिळणार या आविर्भावात फिरत आहेत पण या मतदारसंघातील भाजपा पदाधिकारी यांची दाळ शिजू देणार नसून आता दर्यापूर मतदारसंघात बाहेरचे पार्सल चालणार नसल्याचा घणाघात माजी खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी केला आहे.



दर्यापूर मतदार संघात बाहेरचे पार्सल खपवून घेतले जाणार नाही स्थानिकानाच भाजपा उमेदवारी देईल आणि स्थानिकच उमेदवार निवडून येवू शकतो असेही नवनीत राणा म्हणाल्यात.

आपण भाजपा च्या विचारधारेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी कटिबद्ध असून पक्ष देईल त्या कमळ चिन्हावर लढणाऱ्या उमेदवाराच्या विजयासाठी संपूर्ण ताकदीने प्रयत्न करून आणि जिल्ह्यातील मेळघाट,अचलपूर,दर्यापूर,तिवसा मतदारसंघात कमळ चिन्हावरील सर्व उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करू असल्याचे नवनीत राणा म्हणाल्या.

## पावसाचा ३ लाखांवर शेतकऱ्यांना फटका

### पश्चिम विदर्भाला हवा ३८६ कोटी २३ लाखांचा निधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

पावसाळ्यातील अतिवृष्टी व पुराचा फटका बसल्याने पश्चिम विदर्भाच्या पाच जिल्ह्यातील ३ लाखांवर शेतकरी बाधित झाले आहेत. या सर्वांनी २ लाख ८० हजार ६१४ हेक्टर शेतजमीनीतील पिके जवळपास गमावली असून त्यांना ३८६ कोटी २३ लाख ४८ हजार रुपयांची मदत दिली जावी, असा प्रस्ताव विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडेय यांनी राज्य शासनाकडे पाठविला आहे.

शासकीय व्याख्येनुसार पावसाळ्याचा कालवधी १ जून ते ३० सप्टेंबर असा असतो. प्रशासनाच्या मते या काळात ऑगस्ट महिन्यात सर्वाधिक नुकसान झाले. त्यामुळे एकूण ३ लाख २ हजार ८९ शेतकरी अडचणीत आले असून त्यांना पिकांवर पाणी सोडावे लागले. त्यामुळे ३ हेक्टरच्या मर्यादेत राहून या शेतकऱ्यांना ३८६ कोटी २३ लाख ४८ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान देय आहे. त्यासाठी कृषी, महसूल आणि ग्रामविकास विभागाचे संयुक्त सर्वेक्षण विभागीय आयुक्त कार्यालयात पोचले असून त्यात खरीप व बागायती पिकांसह फळपिकांचाही समावेश आहे.

## चंद्रकांतदादा पाटील सपत्नीक अंबादेवीच्या दर्शनाला

### राज्यात महायुतीचं सरकार येऊ दे व महायुतीचा मुख्यमंत्री होऊ दे – चंद्रकांतदादा पाटील



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी सपत्नीक विदर्भाचे कुलदैवत असलेल्या अमरावती येथील अंबादेवीचे दर्शन घेतले. यावेळी मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या पत्नी अंजली पाटील यांनी अंबादेवीची मनोभावे पूजा करून ओटी भरली. राज्यात महायुतीचे सरकार येऊ दे व महायुतीचा मुख्यमंत्री होऊ दे असे साकडं अंबादेवीच्या चरणी घातलं असल्याची प्रतिक्रिया चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील आजएक दिवसीय दौऱ्यावर अमरावती मध्ये आले असता त्यांनी आई अंबादेवी व एकविरा देवीचे दर्शन घेतले त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधत हर्षवर्धन पाटील यांनी केलेल्या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्ष प्रवेशावर आपली प्रतिक्रिया दिली ते म्हणाले कि राजकारणामध्ये महत्त्वकांक्षा ही नात्यांच्यावर तत्त्वांच्यावर जात आहे तो आम्हाला अनुभव नाही.आमचं ''जिना यहा मरणा यहा हे धोरण आहे.''ज्यांचा फार मोठा संस्थांचा व्याप असतो त्यांना आमदार किंवा खासदारकी शिवाय जगणं अशक्य असतं. संस्था जगवणं शक्य नसत.

हर्षवर्धनजी आणि आमच्या काही राग नाही हर्षवर्धन पाटील यांना पार्टीने खूप दिलं आहे.अमित भाईंनी आणि देवेंद्र फडणसांनी खूप प्रेम केल आहे.दरवेळी प्रमाणे मी माझ्या लोकांना विचारून निर्णय घेतला असं म्हणणं हर्षवर्धन पाटलांच योग्य नाही शेवटी निर्णय आपण आपला करत असतो आणि लोकांना समजून सांगत असतो.राजकारणातच नाही तर जिवंत माणसाच्या जीवनामध्ये कालचक्र ही फिरत असतात.

२०१९ ला ही स्थिती आमची होती हा आला तो आला तो आला ही स्थिती आमची होती पुष्कळ रांग होती पण विश्वासघाताने नंतर आमचे सरकार गेलं सरकार जर गेल नसतं तर औषध द्यायलाही शिल्लक राहिलं नसतं. सगळी काँग्रेस राष्ट्रवादी झाड्डून आमच्याकडे आली असती.

कालचक्र हे बदलत असत त्यामुळे ते आता बदलल आहे त्यामुळे तिकडे रांग लागली आहे.दोन-चार दिवसांनी एखादी जर घटना घडली तर इकडे रांग पण लागू शकते. महाराष्ट्राचा अर्थसंकल्प तिजोरी कशी भरते हे त्यांना माहीत नाही राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. लोकांच्या कल्याणासाठी ही योजना आहे त्यामुळे संजय राऊत यांनी काळजी करण्याचे कारण नाही.याचवेळी न्यायमूर्ती भूषण गावी हे सुद्धा अंबादेवी मंदिरात दर्शनासाठी आले होते या वेळी दोघांमध्ये संवाद सुद्धा झाला. अंबादेवी मंदिराच्या वतीने यावेळी चंद्रकांत दादा पाटील यांचा शाल श्रीफळ देत सत्कार हि करण्यात आला या वेळी प्रवीण पोटे पाटील,तुषार भारतीय,चेतन गावंडे श भाजप चे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

